साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
VISHVANAYAK
Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ४० ■ मंगळवार दि.२९ सप्टेंबर २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 40 ■ Tuesday Dt. 29 September 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## बदनामी केल्याने महिला आक्रमक

**बीड । प्रतिनिधी**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सभेसाठी व उपोषण स्थळी जाण्यासाठी महिलांना पैसे वाटल्याचा आरोप न्यूज चॅनेल आणि सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून पाटोदा येथील महिलांची बदनामी केल्याचा आरोप करत अजय बारसकर यांच्याविरोधात पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पाटोदा येथील रहिवासी नयना किशोर भाकरे यांनी ही तक्रार दिली. तक्रारीनुसार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी 'न्यूज आयबीएन लोकमत' या वृत्तवाहिनीवर प्रसारित झालेला अजय बारसकर यांचा व्हिडिओ तक्रारदारांच्या निदर्शनास आला. या व्हिडिओमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या पाटोदा येथील आंदोलनासंदर्भात आक्षेपार्ह व बदनामीकारक विधाने करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

पाटोदा येथील नसलेल्या महिलांना पाटोद्यातील असल्याचे सांगून त्यांना ५०० रुपये देऊन आंदोलनासाठी आणल्याचा आरोप करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या विधानामुळे पाटोद्यातील महिलांची बदनामी झाली असून समाजात गैरसमज व असंतोष निर्माण होण्याची शक्यता असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे.

# अंजुमन शिक्षण संस्था की भ्रष्टाचाराची फॅक्टरी?

## कामरान खान यांच्या तक्रारीने खळबळ; अंजुमन संस्थेवर एसआयटी आणि फौजदारी गुन्ह्याची टांगती तलवार

### कोट्यवधींचा शिक्षण घोटाळा उघड; वक्फ जमीन गिळंकृत, बोगस भरतीचा बाजार!
### न्यायालय आणि वक्फ बोर्डालाच आव्हान; अंजुमन संस्थेने बीडमध्ये मांडलाय बेकायदेशीर धंदा!

**बीड । विश्वनायक न्यूज**

**बीड शहरातील शिक्षण क्षेत्रात खळबळ उडवून देणारा एक अत्यंत गंभीर आणि हादरवून टाकणारा महाघोटाळा उघडकीस आला आहे. बीडमधील कुप्रसिद्ध 'अंजुमन इशात-ए-तालीम' संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांवर आता प्रशासकीय पातळीवर फास आवळण्यास सुरुवात झाली आहे. वक्फ बोर्डाची जमीन बळकावणे, न्यायालयाच्या आदेशाला पायदळी तुडवणे, बोगस पटसंख्या दाखवून शासकीय अनुदाची लूट करणे आणि शिक्षक भरतीचा बाजार मांडल्याप्रकरणी गृह विभाग, शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष कामरान खान यांनी आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकाऱ्यांकडे तडाखेबंद तक्रार दाखल केली होती.**









या गंभीर अर्जाची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल-१), बीड यांनी अत्यंत कडक पाऊल उचलत दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सविस्तर पत्र पाठवून या प्रकरणी तातडीने नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.प्राथमिक शिक्षणाधिकारी, बीड यांनी दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर केलेल्या अतिशय दोषसिद्ध अहवालात संस्थेचे अनेक काळे कारनामे बाहेर आले आहेत. सन २०२५-२६ चे प्रवेश निर्गम व शाळा अभिलेखे पूर्णपणे अपूर्ण असून, त्यात मोठ्या प्रमाणावर बनावटगिरी करण्यात आल्याचा संशय बळावला आहे. कोणतीही अधिकृत तुकडी व अनुदान मान्यता नसताना बेकायदेशीरपणे वर्ग चालवून विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात लोटले जात आहे.

मागील ५ वर्षांत खोट्या संचमान्यतेसाठी विद्यार्थ्यांची कागदोपत्री अदलाबदल करून शासकीय अनुदानाचा लाभाट लावला जात आहे. संस्थेच्या सचिव व पदाधिकाऱ्यांनी आपल्याच कुटुंबातील ७ ते ८ जणांना बेकायदेशीरपणे शिक्षक म्हणून लाटले असून, पदे मिळवण्यासाठी २५ ते २६ लाखांची बोली लावली जात असल्याचा गंभीर आरोप आहे. जामा मस्जिदच्या दुसऱ्या अशुरखान्याची वक्फ बोर्डाची जमीन बळकावून, नगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता थेट तीन मजली पक्के 'मिल्लिया गर्ल्स शाळेचे' अनधिकृत बांधकाम उभे करण्यात आले आहे. अंबाजोगाई येथील 'मिल्लिया शाळा' ज्या जागेवर आहे, ती केवळ शिक्षकांच्या राहण्यासाठी होती; मात्र न्यायालयाने घालून दिलेली मर्यादा झुगारून तिथे थेट शाळा थाटण्यात आली आहे.सेमी इंग्रजीच्या नावाखाली विनाअनुदानित शाळा चालवण्याचे सांगून, प्रत्यक्षात अनुदानित शिक्षकांकडूनच काम करून घेत शासनाची दरमहा लाखो रुपयांची आर्थिक लूट सुरू आहे.

### कामरान खान यांच्या आक्रमक मागण्या व प्रशासनाचा बडगा.!

शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष कामरान खान यांनी या प्रकरणात कोणतीही कुचराई खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा दिला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून 'एसआयटी' मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच, इतके सगळे पुरावे असतानाही दोषींना अभय देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवरही बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. जर या महाघोटाळेबाजांवर लवकरात लवकर कठोर कायदेशीर कारवाई झाली नाही, तर बीडमधील नागरिक व शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा कामरान खान यांच्या वतीने देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानंतर आता शिक्षण व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, दोषींवर काय कारवाई होते याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

## बीड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी

**बीड । प्रतिनिधी**

बीड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या पालवन चौक ते रेल्वे स्थानक मार्गावर शनिवारी (दि. २६ सप्टेंबर) रात्री नऊ वाजल्यापासून मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. यामुळे पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वेच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.



बीड-पुणे रेल्वे रात्री ९.३० वाजता असल्याने जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेले अनेक प्रवासी रेल्वे स्थानकाकडे धाव घेत होते. मात्र, पालवन चौक ते रेल्वे स्थानक मार्गावर सिमेंट कॉँक्रीटचे काम सुरू असल्याने वाहतूक एकाच बाजूने सुरू होती. त्यामुळे पालवण चौक परिसरासह मार्गावर दुचाकी, चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

सुमारे अर्धा तास वाहतूक कोंडी कायम राहिल्याने रेल्वे पकडण्यासाठी निघालेल्या प्रवाशांची चांगलीच तारांबळ उडाली. वाहतूक कोंडीमुळे काही प्रवाशांची रेल्वे चुकण्याची शक्यता निर्माण झाली होती. या प्रकारामुळे नागरिक आणि प्रवाशांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला.

पालवन चौक ते रेल्वे स्थानक मार्गावरील रस्त्याची काम सुरू असताना वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी, तसेच या जाणाऱ्या रस्त्यावर अनेक पथदिवे बंद असल्याने एखादी घटना किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे या रस्त्यावरील पथदिवे तात्काळ सुरू करून वाहतूक सुरळीत करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## डीवायएसपी वेंकटराम पथकाचा पहाटे जुगाऱ्यांना दणका!

### १४ जुगारी ताब्यात; ४ लाख २२ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील अवैध धंद्यांविरोधात ऊधडझ वेंकटराम यांच्या पथकाने कारवाईचा धडाका सुरूच ठेवला आहे. हिरालाल चौक परिसरातील पांडे गल्ली येथे सुरू असलेल्या पत्त्यांच्या जुगार अड्ड्यावर दिनांक २१ सप्टेंबर सोमवार रोजी पहाटे छापा टाकून पोलिसांनी तब्बल १४ जणांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व इतर साहित्य असा एकूण ४ लाख २२ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शहरातील हिरालाल चौक पांडे गल्ली, बीड परिसरातील एका ठिकाणी काही इसम पत्त्यांवर पैशांची हार-जीत लावून जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून ऊधडझ वेंकटराम यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारला. या कारवाईमध्ये रोख रक्कम, पत्ते आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ४,२२,१७० किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२९५/२०२६ नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ मधील कलम ४ व ५ अन्वये १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.



**अवैध धंद्यांविरोधात पथकाची मोहीम सुरूच**

डीवायएसपी वेंकटराम यांच्या पथकाकडून मागील काही महिन्यांपासून जुगार अड्डे, विनापरवाना वाळू वाहतूक व साठा यांसह विविध अवैध धंद्यांविरोधात सातत्याने कारवाया करण्यात येत आहेत. यापूर्वी शिवाजी नगर,पेठ बीड सह बीड बायपास रोडवरील संभाजी राजे चौक परिसरातील एका शेताजवळील घरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावरही कारवाई करण्यात आली होती.

शहरातील जुगार आणि इतर अवैध धंद्यांविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. कारवाईनंतर पुन्हा त्याच ठिकाणी अवैध धंदे सुरू होणार नाहीत, यासाठी पोलिसांनी सातत्याने कारवाया कराव्यात तसेच बीड शहर, ग्रामीण व जिल्ह्यातील परवानाच्या नावाखाली, नियमाची पायमल्ली करणाऱ्या व रात्रंनदिवस चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि डीवायएसपी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत झडख सय्यद, पोलीस हवालदार राहुल शिंदे, अशोक दराडे तसेच पोलीस अंमलदार अविनाश सानप, कुलदीप औसरमल, शशिकांत ढाकणे आणि विशाल जगताप सहभागी झाले.

## वोट चोरी विरोधात कॉँग्रेसचे बीडमध्ये आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**




बीड जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्ञानेश कुमार यांच्या प्रतिमेस जोडे मारून आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना सोनवणे म्हणाले की, भारतीय लोकशाहीला जगात अनन्यसाधारण महत्त्व असताना लोकशाहीत निवडणुका या पारदर्शक व्हायला हव्यात. निवडणूक आयोग हे स्वायत्त व स्वतंत्र असताना सध्या मात्र आयोगाचे आयुक्त सत्ताधारी पक्षाचे बाहुले झाल्याचे दिसुन येत आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार व आयोगातील इतर सदस्यांचा अवमेळ जगजाहीर असताना एसआयआर च्या नावाखाली संविधान आणि लोकशाहीला मानणाऱ्या मतदाराला वगळण्याचे काम ज्ञानेश कुमार हे सत्ताधारी पक्षाशी संगणमत करून करत असल्याचा आरोप सोनवणे यांनी केले त्याचबरोबर ज्ञानेश कुमार यांना तात्काळ बडतर्फ करून अटक करण्याची मागणी देखील करण्यात आली.

यावेळी या आंदोलनास ज्येष्ठ नेत्या सुशीला मोराळे, दादासाहेब मुंडे, गणेश बजगुडे, बाळासाहेब ठोंबरे, प्रकाश देशमुख, नवनाथ थोटे, गणेश राऊत, इलियास टेलर, गणेश जवकर, रामधन जमले, दत्ता कांबळे, अविनाश डपरे, संतोष निकाळजे, रमेश पाटील, महावीर मस्के, प्रकाश मुंडे, फारुख भाई, महेश बेदरे, शिवाजी कोठुळे, प्रवीण खोडसे, शिवाजी देशमुख, बहादूर भाई, रणजित देशमुख, संभाजी जाधव, विजय पवार, शेख अमर, प्रवेश कुरेशी, शेख अर्शद, नगरसेवक कुरेशी, नगरसेवक बब्बू भाई, मोहम्मद खामरुद्दीन याबरोबर असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवाजीनगर पोलीस ठाण्यासमोरच तुफान हाणामारी!

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या अगदी समोरच आज, दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास, आठ-दहा जणांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली. या मारामारीत एकाच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन डोके फुटल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस ठाण्याच्या दारातच झालेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.

प्राथमिक माहितीनुसार, रिक्षाचालक आणि दुचाकीचालक यांच्यात कट लागण्याच्या कारणावरून वाद झाला. पाहता पाहता वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आठ-दहा जण एकमेकांवर तुटून पडले. शिवीगाळ, धक्काबुक्की आणि मारामारीमुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून संबंधित टोळक्याला ताब्यात घेत पोलीस ठाण्यात आणले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.



**पोलीस ठाण्याच्या दारातच मारामारी; पोलिसांचा धाक राहिला का?**

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही काळात किरकोळ कारणांवरून भांडणे, हाणामारी तसेच धारदार शस्त्रांनी हल्ल्याच्या घटना समोर आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी माने कॉम्प्लेक्स परिसरात आठ-दहा जणांनी दोघांवर लाठ्या-काठ्या व धारदार शस्त्रांनी हल्ला केला होता. या घटनेत दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यातील काही आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर आज थेट पोलीस ठाण्याच्या दारातच आठ-दहा जणांनी फ्रीस्टाइल हाणामारी करण्याचे धाडस केल्याने पोलिसांचा गुन्हेगारांवरील धाक कमी झाला आहे का? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

पोलीस ठाण्यासमोरच कायदा हातात घेण्याची हिम्मत येते कुठून, असा प्रश्नही या घटनेनंतर उपस्थित झाला असून, शिवाजीनगर पोलिसांनी अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करून पोलिसांनी आपला खाक्या दाखवावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## दुष्काळ जाहीर करुन चारा छावण्या व मदत जाहीर करा अन्यथा अमरण उपोषण

**जिल्हाधिकारी यांना रोहन गलांडे यांची मागणी**

**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन चारा छावण्या व दुष्काळी मदत जाहीर पंधरा दिवसात सरकारने जाहीर करावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा ५/१०/२०२६ रोजी चिंचोली माळी येथे अमरण उपोषण करणार असा इशारा निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व सरकारला दीला आहे.

या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की, केज तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन, चारा छावण्या व दुष्काळी मदत पंधरा दिवसात सरकारने जाहीर करावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा ५/१०/२०२६ रोजी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे अमरण उपोषण करणार, असा इशारा निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व सरकारला दिला आहे. केज तालुक्यातील पशुपालक, शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. कारण पाऊस नाही पडल्यांने शेतकऱ्यांचा पशुचा खुप मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वरील विनंती सरकारने मान्य कराव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे.

सम्पादकीय

# उत्सवातील व्हीआयपी

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर आणि छत्रपती शिवरायांच्या उपस्थितीची अनुभूती देणारे पुणे शहर म्हटले की, डोळ्यांसमोर उभी राहते ती एक शिस्तप्रिय, विद्वानांची आणि संतांची परंपरा. समाजसुधारकांचा संपन्न वारसा. परंतु, अलीकडच्या काही वर्षांत या पुण्याचे रूप गणेशोत्सवाच्या काळात पूर्णपणे बदलून जाते आहे. मानाचे पाच गणपती असोत वा प्रसिद्ध श्रीमंत गणेश मंडळे, बाप्पाच्या दर्शनासाठी उसळणार्या जनसागरामुळे उत्सवाच्या काळात मध्यवर्ती भागात पुरता बोजवारा उडतो आणि त्यालाच हातभार लागतो तो व्हीआयपी संस्कृतीचा. यामुळे आज पुण्याच्या सांस्कृतिक वैभवालाच वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले आहे. कोंडी वा बजबजपुरी माजणे हा केवळ एका सणाचा प्रश्न नाही, तर तो नागरिकांच्या जगण्याच्या अधिकाराचा आणि नागरी शिस्तीचा गंभीर विषय उपस्थित करतो. वास्तविक गणेशोत्सवाचे दिवस म्हणजे पुण्यासाठी एक आध्यात्मिक पर्वणी असते. कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या मानाच्या गणपतींच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपर्यातून नव्हे, तर देशातून भाविक येतात. यासोबतच इतर काही प्रमुख मंडळे जगप्रसिद्ध झाली आहेत. लोकांची ही श्रद्धा आणि बाप्पाप्रती असलेली भक्ती पूर्णपणे आदरणीय आहे. प्रश्न श्रद्धेचा नसून, उत्सवाच्या काळात निर्माण होणार्या व्यवस्थापनाच्या ढिसाळपणाचा आणि महत्त्वाच्या व्यक्तींच्या म्हणजे माननीयांच्या लवाजम्याचा आहे. जेव्हा एखादा व्हीआयपी किंवा राजकारणी गणपती दर्शनासाठी निघतो, तेव्हा संपूर्ण पुण्याच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक व्यवस्था केवळ कागदावर उरते आणि प्रत्यक्षात बोजवारा उडतो. अचानक रस्ते बंद करणे, वाहतूक अन्यत्र वळवणे, ताफ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे आणि सर्वसामान्य जनता तासन्तास रांगेत ताटकळत असताना व्हीआयपींसाठी रेड कार्पेट अंथरून त्यांना तत्काळ दर्शनाचा लाभ देणे, हे कोणत्या भक्ती संस्कृतीचे लक्षण आहे? बाप्पाच्या दरबारात राजा आणि सामान्य सगळेच समान असतात, असे आपण मानतो; त्याच्या दर्शनासाठी कोणालाही प्राधान्य नसते आणि मज्ञावही नसतो. तसेच जे त्याच्या दर्शनासाठी आलेले नाहीत. तथापि, आपली रोजची जगण्याची लढाई लढत कर्मवादाला प्राधान्य देत आपल्या व्यापात गुंतले आहेत त्यांच्या घरी जाण्याच्या अथवा कामाच्या ठिकाणी जाण्याच्या मार्गात व्यवधान निर्माण व्हावे अशी तर बाप्पाची बिलकुलच इच्छा नसते; परंतु व्यवहारात जे चित्र दिसते ते त्याच्या अगदीच उलट असते. महत्त्वाची मंडळी येतात. त्यांनी येऊ नये अशातला भाग नाही. मात्र, हल्ली आपली ताकद दाखवण्यासाठी त्यांनाही गळ घालून आणले जाते. तेही आपला माणूस दुखावू नये म्हणून मुंबईहून तर काही मंडळी चक्क दिल्लीहून वारी करतात. काही माननीयांच्या एक-दोन नव्हे तर तीन-तीन वार्या पुण्यात होतात. वारी करणार्या व्हीआयपींनाही पुण्याच्या कोंडीचा झटका बसला आहे. तरीही केवळ त्यांच्या भक्तांच्या श्रद्धेसाठी ते पुण्याचा दौरा ऐन गणेशोत्सवाच्या काळात करतात. या व्हीआयपी दर्शनामुळे व अनियोजित बंदीमुळे लक्ष्मी रोड, बाजीराव रोड, शिवाजी रोड आणि केळकर रोड यांसारख्या शहराच्या मुख्य वाहिन्या पूर्णपणे ठप्प होतात. सकाळी कामानिमित्त कार्यालयात जाणारे कर्मचारी, परीक्षा किंवा वर्गासाठी निघालेली शाळकरी मुले या कोंडीत अडकून पडतात. पीएमपीएमएलच्या बसेसचे मार्ग बदलल्यामुळे किंवा फेर्या रद्द झाल्यामुळे सर्वसामान्य पादचारी आणि बस प्रवाशांचे अतोनात हाल होतात. या सर्व प्रकारात सर्वात भयानक बाब म्हणजे रुग्णवाहिका. साध्या उपचारासाठी किंवा गंभीर अवस्थेत रुग्णालयात जाणार्या रुग्णांच्या जीवाला या वाहतूककोंडीमुळे धोका निर्माण होतो. व्हीआयपींच्या सायरन वाजवणार्या गाड्या पुढे निघून जातात आणि मागे ॲम्ब्युलन्स व अन्य वाहने तासन्तास रखडतात, हे दृश्य कोणत्याही संवेदनशील मनाला पटणारे नाही. मध्यवर्ती पेठांमध्ये राहणार्या स्थानिक नागरिकांचे दुःख तेच बिचारे जाणोत. घराबाहेर पडणे, वाहने पार्क करणे किंवा साधी दैनंदिन कामे करणेही अशक्य होऊन बसते. लहान व्यापार्यांचा सणासुदीचा व्यवसाय या कोंडीमुळे बुडतो, कारण ग्राहक मध्यवर्ती भागात येण्याचे टाळतात. हा प्रश्न आता केवळ वाहतूक पोलिसांच्या नियमनापुरता उरलेला नाही, तर तो नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा आणि प्रशासकीय इच्छाशक्तीचा आहे. जर पुण्याच्या या ऐतिहासिक गणेशोत्सवाला गालबोट लागायचे नसेल, तर काही कठोर पावले तातडीने उचलणे गरजेचे आहे. मानाच्या गणपतींमध्ये किंवा अन्य मंडळांमध्ये व्हीआयपींसाठी ऐन गर्दीच्या वेळी होणारी विशेष दाराची वा सवलतीची व्यवस्था पूर्णपणे बंद करावी. जमलेच तर त्यांनी नंतर किंवा त्यांच्या व मंडळांच्या सोयीने दूरस्थ दर्शनाचा लाभ घ्यावा. नेत्यांचे किंवा अधिकार्यांचे ताफे नियमांचे उल्लंघन करून चुकीच्या दिशेने जाताना आढळले, तर त्यांच्यावरही सामान्य नागरिकांप्रमाणेच कठोर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्यांसाठी ग्रीन कॉरिडॉरची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी, जेणेकरून कोणाचा जीव कोंडीमुळे जाणार नाही. व्हीआयपी किंवा पाहुण्यांसाठी डिजिटल दर्शन किंवा ऑनलाइन प्रणाली उत्तम पर्याय आहे, जेणेकरून रस्त्यावर कोणताही लवाजमा उभा करण्याची वेळ येणार नाही. गणेशोत्सव हा आपल्या अस्मितेचा आणि आनंदाचा सोहळा आहे. हा उत्सव उत्सवच असावा, त्रासाचा अनुभव नव्हे. श्रद्धेचा मान राखत असतानाच सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन आयुष्य सुरळीत ठेवण्याची नैतिक जबाबदारी प्रशासन, गणेश मंडळे आणि लोकप्रतिनिधी या तिघांचीही आहे. जर व्हीआयपी संस्कृतीचा अट्टहास व त्यासाठी ताकद दाखवण्याचा उत्साह असाच सुरू राहिला, तर उद्याची पिढी या उत्सवाकडे आनंदापेक्षा एक त्रास म्हणून पाहू लागेल. बाप्पाच्या चरणी नतमस्तक होत असताना पुण्याच्या या वैभवाला शिस्तीची आणि समानतेची जोड देण्याची हीच ती खरी वेळ आहे!

# नेकनूरचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्याकडून चौसाळा सर्कल मधील विविध गावांना भेटी

## गणेशोत्सवात कायदा-सुव्यवस्थेसह शांततेचे आवाहन; पांडुरंग आवारे-पाटील यांच्या पुढाकाराने आरती व सत्कार संपन्न

**चौसाळा । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पवित्र पर्वावर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत समाजात शांतता व सलोखा टिकून राहावा, यासाठी नेकनूर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष व शिस्तप्रिय पोलीस निरीक्षक मा.मंगेशजी साळवे साहेब यांनी ग्रामीण भागातील विविध गावांना सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी गणरायाची आरती करून गणेश मंडळाचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांशी संवाद साधत मोलाचे मार्गदर्शन केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार पक्षाचे बालाघाट व चौसाळा सर्कलचे युवा नेते तथा मानेवाडी ग्रा.प.सदस्य पांडुरंग आवारे-पाटील यांच्या आग्रही विनंतीला मान देऊन साळवे साहेबांनी परिसरातील गावांचा दौरा केला. यामध्ये सार्वजनिक गणेश मित्र मंडळ माळवाडी, रूईगव्हाण, जाधव वस्ती, मानेवाडी, तेलपवस्ती, पिंपळगाव घाट, वाडवणा आणि चौसाळा या गावांचा समावेश होता. प्रत्येक गावात साळवे साहेबांचे ग्रामस्थ व गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने, उत्साहात व जल्लोषात स्वागत करून सत्कार केला. सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेले नेतृत्व एका सर्वसामान्य विस्थापित कुटुंबातून जिद्दीने पुढे आलेले अधिकारी म्हणून मंगेशजी साळवे साहेब यांची ओळख आहे. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ८७ गावांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळताना ते नेहमीच सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. गणेशोत्सवादरम्यान समाजकंटकांवर वचक ठेवण्यासोबतच गावोगावी जाऊन त्यांनी दिलेले मार्गदर्शन ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरले.

या प्रसंगी निवृत्त पोलीस निरीक्षक मा.आदिनाथ काशिद साहेब, बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा. वैभवजी मुळे, चौसाळा येथील पत्रकार विकासजी नाईकवाडे, पोलीस कर्मचारी मा. नाना जाधव यांच्यासह स्थानिक गावातील आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गणेश मंडळांचे सर्व पदाधिकारी व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमच्या विनंतीचा आदर ठेवून साहेबांनी मानेवाडीसह परिसरातील सर्व गावांना भेट दिली, गणरायाची आरती केली आणि मोलाचे विचार मांडले. असा कर्तव्यदक्ष व सर्व सामान्य जनतेची जाण आणि नाळ असणारे अधिकारी लाभणे हे आमच्या भागाचे भाग्य आहे, अशी कृतज्ञता व्यक्त करत मराठा सेवक पांडुरंग आवारे-पाटील यांनी सर्व ग्रामस्थांच्या वतीने पोलीस निरीक्षक मंगेशजी साळवे साहेबांचे मनःपूर्वक आभार मानले.



क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या १७ वर्षा खालील मुलांच्या गटामध्ये शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत लोणी काळभोर (ता. हवेली) येथील रेनबो इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी गुरुराज राजकुमार वलांडे याने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे, त्याचबरोबर पुढील होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी गुरुराजची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडाशिक्षक निखिल जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. साने संगीत विद्यालयाकडून आज गुरुराज वलांडेचा गुणगौरव करून सत्कार करण्यात आला. स्कूलच्या या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष नितीन काळभोर आणि शिवराज साने सर यांनी कौतुक केले आणि पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# गरीबांचा देवदूत! आरोग्य, समाजसेवा योगदानाची दखल; डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप यांना राज्यस्तरीय पुरस्कार २०२६

**नाशिक । प्रतिनिधी**

भूमिका बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नाशिक यांच्या वतीने आयोजित 'एकता संमेलन २०२६' तसेच शिक्षक दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी आरोग्य, सामाजिक सेवा आणि पत्रकारिता व संपादकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप (मुंबई, संगमनेरकर) यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



पत्रकारिता व संपादकीय क्षेत्रात कार्यरत असतानाच आरोग्य आणि सामाजिक सेवेतून गरजू नागरिकांना मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती तसेच आवश्यक सहकार्य मिळवून देण्यासाठी डॉ. संकेत सानप सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या जनहिताच्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत पत्रकारिता, सामाजिक सेवा आणि आरोग्य क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या डॉ. संकेत सानप यांच्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले. गरजू नागरिकांना मदत, आरोग्यविषयक जनजागृती आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.

या पुरस्कारामुळे सामाजिक, आरोग्य आणि पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, भविष्यातही जनहितासाठी अधिक व्यापक स्वरूपात काम करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. सन्मान ही केवळ कौतुकाची थाप नसून, समाजासाठी आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा आहे. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत आणि योग्य मार्गदर्शन पोहोचविण्यासाठी माझे कार्य यापुढेही सुरू राहील, अशी भावना डॉ. संकेत सानप यांनी व्यक्त केली. आरोग्यसेवा, समाजसेवा आणि पत्रकारिता या तिन्ही क्षेत्रांत कार्यरत असलेल्या डॉ. संकेत सानप यांच्या या गौरवामुळे संगमनेरकरांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# धारूर तहसील कार्यालयात महावितरणचे किऑस्क सेंटर

**सर्व माहिती एकाच ठिकाणी 'सेवा संकल्प' अभियानाला प्रारंभ**

**धारूर । प्रतिनिधी**

वीजग्राहकांना महावितरणच्या विविध सेवा अधिक वेगाने व सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात तसेच सौरऊर्जा योजनांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी महावितरणकडून 'सेवा सेतू अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तहसील कार्यालय धारूर येथे विशेष किऑस्क सेंटर उभारण्यात आले असून, या किऑस्कवर विविध सौर योजनांसह महावितरणच्या विविध सेवांची माहिती व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० याबाबत नागरिकांना किऑस्कवर माहिती देण्यात येत आहे. पॉम्लेटच्या माध्यमातून योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, आर्थिक लाभ, सौर संच बसविण्याची कार्यपद्धती, अंदाजित खर्च तसेच कर्ज सुविधेबाबत मार्गदर्शन केले जात आहे. निवडसूचीवरील सौर कंत्राटदारांच्या माध्यमातून आवश्यक माहिती व समन्वय उपलब्ध करून देण्यात येत आहे.



या सेंटरला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून एका दिवसात २२ नागरिकांनी भेट देऊन सौर योजना व महावितरणच्या विविध सेवांची माहिती घेतली आहे. या अभियानाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा यासाठी कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे, उप कार्यकारी अभियंता गोकूळ मोरे प्रयत्न करत असून सहाय्यक अभियंता गौरव निकम व लेखा अधिकारी सुहास झरे प्रत्यक्ष नागरिकांना माहिती देत आहेत. १७ ऑक्टोबर पर्यंत हे किऑस्क सेंटर उपलब्ध असणार असून जास्तीत जास्त वीजग्राहकांनी या विशेष किऑस्क सेंटरला भेट देऊन सौर योजनांचा लाभ घ्यावा असे महावितरणने आवाहन केले आहे.

# मुस्लिम वेलफेअर असोसिएशन प्रदेश सचिवपदी अली मोहम्मद तर मराठवाडा प्रमुखपदी अब्दुल समद शेख यांची निवड

**लातुर । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कल्याणकारी उपक्रमांना चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या कार्याची दखल घेऊन मा. सलीम सारंग राष्ट्रीय अध्यक्ष अजमत खान, महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रा.डॉ. रिझवान खान, महाराष्ट्र कार्याध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली मुस्लिम वेलफेअर असोसिएशन प्रदेश सचिवपदी अली मोहम्मद तर मराठवाडा प्रमुखपदी अब्दुल समद शेख यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत निर्णय घेऊन नियुक्ती पत्राद्वारे कळविण्यात आले.





महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यात मुस्लिम वेलफेयर कार्यरत असुन राज्यात सामाजिक उपक्रम, संघटन वाढ व मुस्लिम समाजाचा विकास हा असोसिएशनचा मुख्य उद्देश आहे. तसेच समाजातील गरजू घटकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविणे, शैक्षणिक प्रगती, युवकांचे प्रश्न, महिला सक्षमीकरण, समाजहिताच्या विविध विषयांना वेळोवेळी न्याय व हक्कासाठी मुस्लिम वेलफेअर असोसिएशन सक्रिय होणार आहे. निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भगतसिंगांचे विचार आत्मसात करून तरुणांनी राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे: ॲड. राहुल पायके यांचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे तरुणांना थेट मार्गदर्शन

**बीड / छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

शहीद भगतसिंग हे केवळ वयाच्या २३ व्या वर्षी देशासाठी प्राणांची आहुती देणारे क्रांतिकारक नव्हते, तर ते एक प्रगल्भ विचारवंत आणि अभ्यासू युवक होते. आजचा तरुण आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत आणि रील्सच्या चक्रव्यूहात अडकत चालला आहे. अशा वेळी तरुणाईला योग्य दिशा मिळण्यासाठी भगतसिंग यांच्या वैचारिक क्रांतीची आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन 'पीपल्स थॉट्स इन इंडिया युथ क्लब'चे संस्थापक अध्यक्ष ड. राहुल अर्जुन पायके यांनी एका विशेष प्रसिद्धीपत्रकाद्वारे तरुणांना मार्गदर्शन करताना केले.क्रांतिसूर्य शहीद भगतसिंग यांच्या जयंतीचे औचित्य साधून ड. राहुल पायके यांनी राज्यातील युवा वर्गाशी प्रसिद्धीपत्रकाद्वारे थेट संवाद साधला.



वैचारिक क्रांतीची गरज: भगतसिंगांना केवळ इंग्रजांना देशाबाहेर काढायचे नव्हते, तर त्यांना देशातील गरिबी, अशिक्षितपणा, जातीयवाद आणि अंधश्रद्धा नष्ट करून 'माणसाने माणसाचे शोषण न करणारा' समतावादी भारत घडवायचा होता. आजच्या तरुणाने हीच वैचारिक क्रांती पुढे नेली पाहिजे.

वाचन संस्कृतीचे पुनरुज्जीवन: भगतसिंगांकडे असणारी वैचारिक धार त्यांच्या अफाट वाचनातून आली होती. आजचा तरुण वाचनापासून दूर जात आहे. समाजात काय योग्य आणि काय अयोग्य हे समजून घेण्यासाठी तरुणांनी हातात पुस्तके घेतली पाहिजेत. बेरोजगारी, सामाजिक विषमता आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी तरुणांनी केवळ घोषणाबाजी न करता प्रत्यक्ष रचनात्मक कामात सहभागी झाले पाहिजे.

ड. राहुल पायके यांनी पत्रकात नमूद केले की, युथ क्लबच्या वतीने आगामी काळात तरुणांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी ठिकठिकाणी 'भगतसिंग वाचन कट्टा' सुरू करण्यात येणार आहे. तसेच तरुणांच्या कौशल्याचा देशाच्या विकासासाठी कसा उपयोग करता येईल, यासाठी क्लब विविध उपक्रम राबवणार आहे. चला, भगतसिंगांच्या जयंतीनिमित्त केवळ त्यांच्या जयघोषाच्या घोषणा न देता, त्यांच्या विचारांची मशाल आपल्या हृदयात पेटवूया आणि देशाच्या नवनिर्माणासाठी सज्ज होऊया! असे आवाहन त्यांनी शेवटी केले.-

# किती हा दैवदुर विलास!

स्वतंत्र भारतात ७९ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर एकदाची बीडला रेल्वे आली आणि बीडहून पुणे व पुणेहून बीड अशी प्रवासी वाहतूक सुरू झाली. मात्र या रेल्वे मार्गासाठी भरीव आणि ठोस असे पाऊल उचलणारे राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख साहेबांची साधी आठवण सुद्धा कोणी नाही काढली.

आपला भारत देश स्वतंत्र होण्याअगोदर पासून निजाम काळात हैदराबाद ते परळी हा रेल्वे मार्ग निजाम सरकारने सुरू केला होता. बीड जिल्हा मात्र रेल्वे मार्गाच्या नकाशावर परळी वगळता कुठेही नव्हता. हा रेल्वे मार्ग व्हावा याकरिता बीड जिल्हा रेल्वे कृती समिती, स्वातंत्र्य सैनिक, समाजसेवक, तत्कालीन खासदारांनीही वेळोवेळी आवाज उठविले. लोकप्रतिनिधी वगळता इतरांनी वेळोवेळी आंदोलनेही केली. बीड जिल्ह्याला रेल्वे हवी म्हणून अनेकदा दिल्लीच्या वाऱ्या केल्या. सातत्याने मागणी केली. आज यापैकी अनेकांची नावे अनेकजण आठवणीने काढत आहेत. मात्र हा रेल्वे मार्ग व्हावा याकरिता ठोस आणि भक्कम पाऊल उचलणारे महाराष्ट्र राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे नाव कोणाच्या ध्यानीमनी ही येत नाहीये. ही फार मोठी शोकांतिका आहे.

परळी-बीड-अहेमदनगर आताचे अहिल्यानगर हा रेल्वे मार्ग व्हावा, याकरिता मुख्यमंत्री पदावर असताना विलासराव देशमुख यांनी केंद्रासोबत यशस्वी वाटाघाटी करत या रेल्वे मार्गासाठी आवश्यक असलेल्या निधीतील ५०% खर्च केंद्राने करावा आणि ५०% खर्च महाराष्ट्र सरकार उचलेल असा निर्णय घेऊन त्यावर अंमलबजावणीही केली. यामुळे या रेल्वे मार्गाच्या कामाला खऱ्या अर्थाने गती मिळाली आणि ते पूर्णत्वास आले. सद्यस्थितीत जरी बीड-परळी रेल्वे मार्ग अजून जोडला गेला नसला तरी तो पुढील वर्षी पर्यंत जोडला जाणारच आहे आणि परळी ते मुंबई असा प्रवास बीड जिल्हावासियांना आरामदायक व माफक दरात करता येणार आहे. जर विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री असताना फिफ्टी-फिफ्टी चा निर्णय घेतला नसता किंवा त्याची अंमलबजावणी केली नसती तर आज बीड मधून रेल्वे धावली असती की नाही हे सांगता आले नसते.



लोकहितासाठी अनेक जण शासन-प्रशासनाकडे वेगवेगळ्या मागण्या करत असतात. त्या सर्वच पूर्ण होतात असेही नाही मात्र त्या मागण्या लावून धरलेल्यांची नावे लोकांच्या लक्षात राहतात. हे खरे असले तरी जो कोणतेही काम करण्यासाठी भक्कम आणि ठोस पाऊल उचलून आर्थिक तजवीज करतो, त्यात त्याचा सिंहाचा वाटा असतो. अशा व्यक्तीचे विस्मरण पडावे म्हणजे ती कृतघ्नता ठरते.

आज घडीला बीड रेल्वेचे शिल्पकार म्हणून काहीजण बीड लोकसभा मतदारसंघात होऊन गेलेल्या काही खासदारांच्या नावांचा भडीमार सोशल मीडियासह प्रसार माध्यमातून करू लागले आहेत. ज्यांच्या नावाचा आज उदोउदो करण्यात येऊ लागला आहे. एक तर ते राजकारणातील मातब्बर-गब्बर घराण्यातील आहेत किंवा ते विद्यमान सत्ताधारी पक्षात आहेत.

विलासराव देशमुख आज आपल्यात नाहीत. त्यांचे पुत्र अमित देशमुख आणि धीरज देशमुख हे राजकारणात सक्रिय आहेत पण हे दोन्ही पुत्र विद्यमान सत्ताधारी पक्षाचे नाहीत. मात्र त्यांच्या पत्नी किंवा तिसरे पुत्र अभिनेते रितेश देशमुख ज्यांचा चेहरा मोहरा पूर्णतः विलासरावांसारखाच आहे. त्यांनी काही महिन्यांपूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपटात राजेंची भूमिका मोठ्या तडफेने साकारली होती. विलासरावांचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्या पत्नी व रितेश देशमुख यांनाही उद्घाटन समारंभात निमंत्रित करता आले असते. परंतु आज राजकारणात नीतिमत्ता राहिली नसल्याचे सगळीकडे दिसून येत आहे.

बीड रेल्वेच्या उद्घाटनानिमित्ताने विलासराव आणि अंतुले यांचा एक किस्सा सहजच मनात आला. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर असताना तत्कालीन मुख्यमंत्री अब्दुल रहेमान अंतुले यांना विलासराव देशमुख आमदार असताना त्यांनी एका कार्यक्रमासाठी लातूरात बोलविले होते. तेव्हा विलासरावांनी भाषण करताना सांगितले, 'अंतुले साहेब मला मंत्रिमंडळात मंत्री पद दिले नाही, निदान आम्हाला लातूर जिल्हा द्या'. तेव्हा लातूर हा उस्मानाबादचा तालुका होता. विलासरावांच्या या मागणीला सभेतच उत्तर देताना अंतुले यांनी विलासराव तुम्हाला लातूर जिल्हा दिला असे ताबडतोब सांगितले आणि लातूर जिल्हा झाला.

कालांतराने लातूर जिल्हा निर्माण होऊन २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने विलासराव देशमुख महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना लातूरात विशेष कार्यक्रम घेतला होता. त्या कार्यक्रमासाठी विलासरावांनी अंतुले यांना मानाने बोलावले आणि त्यांच्या कार्याची जाण ठेवून ऋण व्यक्त करत त्यांचा हृदयी सत्कार केला होता. तेव्हा सत्कार स्वीकारल्यानंतर कार्यक्रमात बोलताना अंतुलेंनी विलासरावांना उद्देशून म्हटले होते, 'विलासराव आज राजकारणात कुणी २५ दिवस लक्षात ठेवत नाही ओ आणि तुम्ही माझी २५ वर्षानंतरही आठवण ठेवली असे म्हणून त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते. अशी होती तेव्हाच्या नेत्यांची नीतिमत्ता.



असे हे दोन्ही नेते आज आपल्यात नाहीत. पण त्यांचे उत्तुंग कर्तुत्व सर्वपरिचित आहे. अशा विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री म्हणून बीड च्या रेल्वे मार्गासाठी ५०% खर्चाची तरतूद राज्य सरकारचे प्रमुख म्हणून केली होती. त्यांच्यानंतर आलेल्या प्रत्येक राज्य सरकारला सुद्धा त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे पालन करावे लागले. रेल्वे मार्गासाठी लागणाऱ्या एकूण खर्चाच्या ५०% खर्च हा केंद्र सरकार सोबत राज्य सरकारलाही उचलावा लागला. एकूण खर्चाचा फिफ्टी-फिफ्टी वाटा केंद्रासोबत राज्याला उचलायला लावणारे विलासराव देशमुख यांचे साधे नावही ही रेल्वे सुरू झाल्यानंतर कुणी घ्यायला तयार नाही. कारण ते ज्या पक्षाचे प्रतिनिधित्व करीत होते तो काँग्रेस आय पक्ष आता विद्यमान सत्ताधारी राहिला नाही. एवढंच नाही तर प्रमुख विरोधी पक्ष म्हणून सुद्धा त्या पक्षाची अवस्था डळमळीत झालेली आहे. बहुतेक यामुळेच या रेल्वे मार्गाचे खरे शिल्पकार म्हणून ज्या विलासराव देशमुख यांची आठवण सदैव व्हायला हवी ती होत नाहीये. किती हा दैवदुर् विलास म्हणावा.

**लेखन - एस.एम.युसूफ़**
**आसेफ़नगर, बीड.**
**संपर्क - ९०२१ ०२ ३१२१**

# लिंबागणेश येथे कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी निदर्शने!

## मराठवाड्यात आठ महिन्यांत ६५३ शेतकरी आत्महत्या; सुरक्षेच्या नावाखाली शेतकऱ्यांची अवमानना करणाऱ्या व्यवस्थेचा निषेध : डॉ. ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

पावसाने दीर्घ खंड दिल्याने खरीप हंगामातील पिके करपली असून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे समिती गठित करणे, लोकप्रतिनिधींचे दौरे, पंचनामे व अहवाल अशा औपचारिक प्रक्रियेत वेळ न दवडता शासनाने तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व विविध सवलती द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. निवेदन मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत, तलाठी गणपत पोतदार, सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, पोलिस जमादार उद्धव तांबे, नवनाथ मुंढे यांनी स्विकारले. यावेळी होमगार्ड शाळीग्राम घरत, गणेश कुलकर्णी, श्रीराम वाघमारे उपस्थित होते.

या मागणीसाठी अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज शुक्रवार, दि.२५ रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निदर्शने करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी हातात करपलेले सोयाबीन पीक घेऊन कोरडा दुष्काळ जाहीर करा. रखडलेला पिक विमा जमा करा अतिवृष्टीची नुकसान भरपाई द्या, हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्या अशी घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधले.



रखडलेला पीकविमा तातडीने द्या; गेल्या वर्षाची हेक्टरी १७,५०० व यंदा हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्या, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

**मराठवाड्यात आठ महिन्यांत ६५३ शेतकरी आत्महत्या; बीडमध्ये सर्वाधिक १४९**

नैसर्गिक संकट, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांच्या कालावधीत मराठवाड्यात ६५३ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाल्याचा दावा करण्यात आला. यामध्ये बीड जिल्ह्यात सर्वाधिक १४९ आत्महत्या झाल्याचे सांगण्यात आले. जिल्हानिहाय आकडेवारीनुसार बीड १४९, छत्रपती संभाजीनगर १३८, धाराशिव ८८, नांदेड ८२, जालना ६१, लातूर ४६, परभणी ४५ आणि हिंगोली ४४, अशी एकूण ६५३ शेतकरी आत्महत्यांची नोंद असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**दुष्काळ पाहणी दौऱ्यातील सुरक्षा व्यवस्थेवरही संताप**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मराठवाड्यातील दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान सुरक्षेच्या नावाखाली शेतकऱ्यांना दोरखंड व बॅरिकेड्स लावून दूर ठेवणे, पोलिसांकडून झाडाझडती घेणे तसेच मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी करणे, या प्रकाराचा डॉ. गणेश ढवळे यांनी निषेध केला. शेतकऱ्यांकडे अतिरेकी, माओवादी किंवा नक्षलवादी असल्यासारखे पाहणाऱ्या व्यवस्थेचा निषेध करतो. अन्नधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकण्यासाठी आलेल्या दौऱ्यात त्यांनाच सुरक्षेच्या नावाखाली दूर ठेवणे ही अवमानकारक बाब आहे,अशी भूमिका डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

शासनाने शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन तातडीने दुष्काळ जाहीर करावा, पीकविमा व नुकसानभरपाईची प्रलंबित रक्कम अदा करावी तसेच शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी राजेभाऊ गिरे, भगवान मोरे, सोमीनाथ कोल्हे, सय्यद अकबर, कृष्णा पितळे, विक्रांत वाणी, संतोष भोसले, शंकर वाणी, दादा गायकवाड, रामदास मुळे, संभाजी वाणी, कृष्णा वायभट, अशोक गोंडे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

# निसार उपग्रहाच्या माहितीच्या अभ्यासासाठी 'NISAR-SAR-X' संगणकीय प्रणाली विकसित

**बीड । प्रतिनिधी**

इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीतील संशोधक, शिक्षणतज्ज्ञ व तंत्रज्ञान नवोपक्रम क्षेत्रात कार्यरत डॉ. अजित कुमार यादव यांनी नासा आणि इस्रो यांच्या संयुक्त निसार उपग्रह मोहिमेशी संबंधित संशोधन फेलो म्हणून काम केले आहे. निसारच्या पृथ्वी निरीक्षण माहितीच्या अभ्यासातील या अनुभवातून त्यांनी 'NISAR-SAR-X v4.0.0' या संशोधनासाठी उपयुक्त संगणकीय प्रणालीच्या विकासाला चालना दिली आहे.

डॉ. अजित कुमार यादव हे रामानुजन अकॅडमी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बीडचे संस्थापक व संचालक असून ठरए ढशलहपेश्रेसळशी झ्रीं. डींव. येथे संशोधन संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी आणि डॉक्टरेट प्राप्त केली असून त्यांचे संशोधन उपग्रहाद्वारे पृथ्वी निरीक्षण, रडार आधारित दूरसंवेदन आणि जमिनीशी संबंधित माहितीच्या अभ्यासावर केंद्रित आहे. त्यांच्या संशोधन कार्याचे अनेक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिके व परिषदांमध्ये प्रकाशित झाले आहेत.



**निसारच्या माहितीचा अभ्यास अधिक सोपा करण्याचा प्रयत्न**

निसार उपग्रहामधून पृथ्वीच्या पृष्ठभागाची मोठ्या प्रमाणावर माहिती मिळते. या माहितीच्या आधारे शेती व पिके, जंगल, पाणी, पूर, जमीन, पर्यावरण आणि शहरी भागांचा अभ्यास करता येतो. मात्र या माहितीचे योग्य विश्लेषण करण्यासाठी विशेष संगणकीय साधनांची आवश्यकता असते. 'NISAR-SAR-X' च्या माध्यमातून उपग्रहाची माहिती पाहणे, तिची गुणवत्ता तपासणे, निवडलेल्या भागाचा सविस्तर अभ्यास करणे, विविध भागांची तुलना करणे आणि मिळालेले निष्कर्ष तपासणे शक्य होणार आहे.

विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक तसेच उपग्रहाच्या माहितीचे संगणकीय विश्लेषण करण्यात रस असणाऱ्या व्यक्तींसाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते. विविध प्रयोग करून उपग्रहाची माहिती कशी वापरावी आणि त्यातून वैज्ञानिक निष्कर्ष कसे मिळवावेत, हे समजण्यास मदत होईल. संशोधनाच्या प्रत्येक टप्प्याची नोंद ठेवता येत असल्याने भविष्यात त्याच प्रक्रियेची पुन्हा पडताळणी करणेही सोपे होणार आहे.

भविष्यात या प्रणालीमध्ये उपग्रहाच्या अधिक प्रगत माहितीचे विश्लेषण, विविध वैज्ञानिक पद्धतींची तुलना आणि संशोधनाच्या अचूकतेची तपासणी करण्यासाठी नवीन सुविधा जोडण्याचे नियोजन आहे. उपग्रहाची माहिती – तपासणी – विश्लेषण – पडताळणी – वैज्ञानिक निष्कर्ष ही संपूर्ण प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि पुनर्वापर करण्यायोग्य बनविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे, अशी माहिती डॉ. अजित कुमार यादव यांनी दिली आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या बीड लोकसभा संघटकपदी ॲड. अरुण जाधव यांची निवड

## पक्ष संघटन मजबूत करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी; बूथपासून जिल्हास्तरापर्यंत संघटन बांधणीवर भर

**बीड । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीच्या पक्ष संघटना बांधणीला वेग देण्यासाठी राज्य कार्यकारी सदस्यांवर जिल्हानिहाय व लोकसभा क्षेत्रनिहाय जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत बीड लोकसभा क्षेत्राच्या संघटना बांधणीची महत्त्वपूर्ण जबाबदारी राज्य कार्यकारी सदस्य ॲड. अरुण जाधव यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

याबाबत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे आणि प्रदेश सरचिटणीस प्रा. सोमनाथ साळुंके यांनी अधिकृत पत्राद्वारे नियुक्ती जाहीर केली आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बीड लोकसभा क्षेत्रात बूथ कमिट्या, ग्राम शाखा, सर्कल, तालुका आणि जिल्हास्तरावरील संघटन मजबूत करणे, सदस्य नोंदणी वाढविणे तसेच विविध आघाड्यांची प्रभावी यंत्रणा उभारणे, या दृष्टीने ॲड. अरुण जाधव यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



ॲड. अरुण जाधव हे वंचित बहुजन आघाडीचे निष्ठावंत नेते म्हणून कार्यरत असून, जामखेड नगरपरिषद निवडणुकीत पक्षाला विजय मिळवून देण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत त्यांनी दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवत आपला जनाधार दाखवून दिला होता. अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड परिसरात पक्ष संघटन उभारणीचा अनुभव असलेल्या ॲड. जाधव यांना आता बीड लोकसभा क्षेत्राची जबाबदारी मिळाल्याने आगामी काळात बीड जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीच्या संघटनात्मक विस्ताराला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर दाखविलेला विश्वास लक्षात घेता, बीड जिल्ह्यात गावपातळीपासून लोकसभा क्षेत्रापर्यंत संघटनात्मक बांधणी करण्याचे मोठे आव्हान ॲड. अरुण जाधव यांच्यासमोर असणार आहे. या नियुक्तीमुळे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, बीडसोबतच हिंगोली, नाशिक, वाशिम–यवतमाळ, चंद्रपूर, अमरावती, नांदेड, बुलढाणा आणि गडचिरोली–चिमूर या लोकसभा क्षेत्रांसाठीही पक्षाकडून प्रभारींच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

# कामरान खान यांना सर्वोत्कृष्ट समाजसेवक पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध रील स्टार शेबू खान तसेच शगुन स्टील अँड फर्निचर यांच्या वतीने ताज पॅलेस, बार्शी नाका, बीड येथे प्रथमच भव्य "Influencer Get Together' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास शिवसेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख कामरान खान यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लावली.

यावेळी सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत शिवसेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख कामरान खान यांना "Best Social Worker of Beed' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमास बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने Instagram, YouTube d Facebook Influencers उपस्थित होते. विविध Influencers यांनी आपल्या Content Creating व कलागुणांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. तसेच कार्यक्रमास नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. बीड जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारच्या Influencer Get Together चे आयोजन करण्यात आल्याने या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

Influencers आणि नागरिकांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा हा अभिनव उपक्रम ठरला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल शेबू खान व शगुन स्टील अँड फर्निचर यांचे कामरान खान यांनी मनःपूर्वक आभार मानत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गोळा फेक स्पर्धेत पलक वीर प्रथम



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनी पलक विष्णू वीर हिने तालुकास्तरीय गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनी पलक विष्णू वीर हिने नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तिला क्रीडा शिक्षक संतोष डोंगर यांनी मार्गदर्शन केले. तिच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक लाड व सर्व शिक्षक सहकारी ग्रामस्थ यांनी तिचे अभिनंदन केले असून सत्कार करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देणे आहेत. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली इमामपूरमध्ये गणेश अनंत चतुर्थी निमित्त कीर्तन सोहळा

# गणरायाच्या भक्तीत रंगले इमामपूर; कीर्तन व महाप्रसाद सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त इमामपूर, येथे युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मवीर प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य कीर्तन सोहळा शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या धार्मिक कार्यक्रमाला भाविकांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमात ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकटस्वामी महाराज संस्था, नेकनूर) यांनी कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक व सामाजिक संदेश दिला. गणेशभक्ती, संतविचार आणि अध्यात्माच्या माध्यमातून त्यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले.



कीर्तन सोहळ्यादरम्यान भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी मोठ्या उत्साहाने कीर्तनाचा लाभ घेतला. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत कार्यक्रमाची सांगता केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक उपक्रमातून भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धर्मवीर प्रतिष्ठानच्या पदाधिकारी, युवा सैनिक शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# अंजिक्य निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात धसदादा क्रिडा मंडळ तर कुमारी गटात शारदा स्पोर्ट क्लब, गेवराई सर्व प्रथम



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व शारदा स्पोर्ट क्लब गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा –२०२६ या स्पर्धा श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथे शिवछत्र स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उदघाटन शारदा स्पोर्ट्स कल्ब चे अध्यक्ष युवा नेते रणवीर अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते संपन्न झाले होते. रणवीर पंडित व बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले.

या स्पर्धेत कुमार गटात सर्व प्रथम क्रमाकचे बक्षीस विभागुन धसदादा क्रिडा मंडळ, आष्टी व शारदा स्पोर्ट्स क्लब गेवराई या संघाने मिळविले तर कुमार गटातील तृतीय क्रमाकाचे बक्षीस विभागुन जय हनुमान क्रिडा मंडळ, महासांगवी ता. पाटोदा व ण्णा हेल्थ क्लब, कुसळंब या संघाने मिळविले तर कुमारी गटात सर्व प्रथम बक्षीस विभागुन शारदा स्पोर्ट्स क्लब, गेवराई व ऑल स्पोर्ट्स अकॅडमी शिरूर कासार या संघाने मिळविले तर तृतीय क्रमाकाचे बक्षीस जयभवानी हायस्कुल, शिवाजीनगर, गढी या संघाने प्राप्त केले. नियोजनपूर्वक व शिस्ती मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या स्पर्धेतुन विरार पश्चिम ता. वसई जि.पालघर येथे होणाऱ्या ५३ व्या कुमार/कुमारी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे.

या अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत यशस्वी झालेल्या क्रिडा मंडळाचे व खेळाडूचे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री शिवाजीराव पंडित महाराष्ट्रराज्य कबड्डी असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष माजी आ. अमरसिंह पंडित, बीडजिल्हा कबड्डी असोसिएशन चे अध्यक्ष आ.विजयसिंह पंडित, जयसिंह पंडित, युवा नेते पृथ्वी पंडित यांनी विजयी संघाचे खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करून! निवड झालेल्या सर्व खेळाडूंना राज्य स्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# नाकलगाव शालेय व्यवस्थापन समिती निवड जाहीर; अध्यक्षपदी इजास शेख, उपाध्यक्षपदी समाधान गायकवाड व अशोक अतकरे



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

नाकलगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीची निवड उत्साहपूर्ण वातावरणात सर्वानुमते पार पडली. अध्यक्षपदी इजास शेख तर उपाध्यक्षपदी समाधान गायकवाड व अशोक अतकरे यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी बळीराम जाधव, सोनाली सारंग पोटभरे, रुबीना रशिद पठाण, निर्मला सुरेश गायकवाड, रेखा दत्ता गवळी, आकाश राधाकिशन पाटोळे, सपना कृष्णा जाधव, नागनाथ किसन शेळके व सविता अतुल रत्नपारखे यांची निवड झाली.

केंद्रप्रमुख नाईकवाडे, मुख्याध्यापक कुलकर्णी सर व सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी पालक, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहापुरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन जोगदंड यांनी केले.

# डॉ. शिवराम खरात यांना ज्येष्ठ नागरिक संस्थेची भावपूर्ण श्रद्धांजली



**गेवराई । प्रतिनिधी**

ग्राहक पंचायत महाराष्ट्र, बीड जिल्हा व श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, गेवराई यांच्यावतीने कै.डॉ. शिवराम परबतराव खरात यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून शोक व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे म्हणाले, जुनी पिढी अत्यंत प्रामाणिक, मायाळू होती. डॉ. खरात यांनी 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' मानून तब्बल ४० वर्षे ग्रामीण भागात सेवा केली. वाहनाची सोय नसतानाही घरोघरी जाऊन रुग्णांना सेवा देण्याचे त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. गेवराईच्या इतिहासात त्यांच्या या भरीव कार्याची नोंद राहील. यावेळी प्रा. चव्हाण सर यांनी तलवाडा येथील डॉ. खरात यांच्या कार्याची माहिती दिली. सर्वांनी जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे, प्रा. अंकुशराव चव्हाण, उद्धाण कचरू बडे, साहेबराव मस्के, तात्यासाहेब मडके, दिगंबर कैलास मडकर, वल्लभ तौर आदी उपस्थित होते.

# बारावीच्या निकालात रेणुका बामदळे यांची बाजी; तालुक्यात प्रथम येत मिळविले विशेष यश

**पाटोदा । प्रतिनिधी**



बारावी परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून विशेष गुणवत्ता प्राप्त केल्याबद्दल कु. रेणुका गणेश बामदळे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. रेणुका यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे कुटुंबासह शाळा व गावाचे नाव उज्ज्वल झाले आहे.

यावेळी नवगण शिक्षण संस्था, राजुरी (न.) व विनायक युवक कल्याण संस्था, ता.जि. बीडचे सचिव डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी रेणुका बामदळे यांच्या यशाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. तसेच प्राचार्य व सर्व शिक्षकवृंदांनी रेणुका यांच्या यशाबद्दल विशेष कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शिक्षकवर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

## जिल्हास्तरीय स्पर्धेत तिन्ही मल्लांनी पटकावला प्रथम क्रमांक; विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विद्यालयातील शिवम दादासाहेब खिल्लारे, अवधूत मिनीनाथ जाधव आणि मल्हार विठ्ठल लेणे या तीन विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत आपल्या-आपल्या वजन गटात प्रथम क्रमांक पटकावत विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी दिमाखदार निवड मिळवली.



शिवम दादासाहेब खिल्लारे याने ६८ किलो वजन गटात, अवधूत मिनीनाथ जाधव याने ७१ किलो वजन गटात, तर मल्हार विठ्ठल लेणे याने ८० किलो वजन गटात दमदार कुस्तीचे प्रदर्शन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. त्यांच्या या यशामुळे तिन्ही विद्यार्थ्यांची आगामी विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**ग्रामीण भागातील गुणवत्तेला मिळाले व्यासपीठ**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही क्रीडा क्षेत्रात मोठी क्षमता असून, योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर जिल्हा व विभागीय स्तरावर यश संपादन करता येते, हे या तिन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. त्यांच्या यशामुळे विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष यू. बी. सुकाळे, सचिव दीपक दादा घुमरे, उपाध्यक्ष कल्याण बापू वाणी, संचालक, प्राचार्य दत्तात्रय कवडे, पर्यवेक्षक मुकुंद मोटे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच क्रीडा शिक्षक सचिन वाणी व मार्गदर्शक गणेश आजबे यांच्या मार्गदर्शनाचे कौतुक करत आगामी विभागीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कुस्तीच्या आखाड्यात मिळवलेल्या या यशामुळे भालचंद्र विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी ऊर्जा मिळाली असून, विभागीय स्पर्धेतही हे तिन्ही मल्ल उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचे व लिंबागणेश परिसराचे नाव उज्ज्वल करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सदोष एसआयआर प्रक्रिया थांबवा; पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करा!

## लोकशाहीचे मारेकरी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाईची मागणी; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने : डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) संबंधित मुद्यांवर तिन सदस्यीय निवडणूक आयोगातील तीन पैकी दोन आयुक्त सुखबीर सिंह संधु आणि विवेक जोशी यांनी वारंवार प्रश्न उपस्थित केले होते.एसआयआरची देशभरातील अंमलबजावणी तीनही निवडणूक आयुक्तांच्या देखरेखीखाली सुरू असताना मात्र संधु आणि जोशी यांनी त्यांना माहीती नसताना घेण्यात आलेल्या आदेशांवर गेल्या १० महिन्यात किमान १४ वेळा (त्यापैकी एकाच दिवशी ४ वेळा) लेखी स्वरूपात आक्षेप घेतले होते मात्र मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पक्षपातीपणे मनमानी कारभार करत विद्यमान सरकारच्या हिताचे निर्णय घेतले त्यामुळे निष्पक्ष मतदान प्रकिया उद्धस्त करणारे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून पायउतार करून तातडीने अटक करण्यात यावी तसेच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाची (SIR) प्रक्रिया सदोष असल्याचा आरोप करत ती तात्काळ थांबवावी, तसेच चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करावेत, या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.




यावेळी आंदोलनकर्त्यांनी लोकशाहीचे मारेकरी ज्ञानेश कुमार यांना अटक करा सदोष डखठ प्रक्रिया थांबवा, पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करा अशा घोषणा देत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता व मतदारांच्या हक्कांच्या संरक्षणाची मागणी केली. आंदोलनकर्त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप घेत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर सध्या डखठ-२०२६ संदर्भातील मतदार सेवा, यादी शोधण्याची सुविधा आणि संबंधित प्रक्रिया उपलब्ध आहे.

**चुकीने वगळलेल्या मतदारांना पुन्हा मतदानाचा अधिकार द्या**

SIR प्रक्रियेत पात्र मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळली गेली असल्यास त्यांची पुनर्तपासणी करून पात्र मतदारांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत आहे किंवा नाही, याची माहिती सहज उपलब्ध करून देण्याबरोबरच हरकती व दुरुस्ती प्रक्रियेला पारदर्शकता आणण्याची मागणीही करण्यात आली.

**निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचा मुद्दा**

निवडणूक आयोगाचे कामकाज अधिक पारदर्शक, स्वतंत्र आणि लोकशाही मूल्यांनुसार होण्यासाठी निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेत व्यापक सहभाग असलेली यंत्रणा असावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या २०२३ च्या निर्णयात पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या निवड समितीची भूमिका मांडण्यात आली होती. त्यानंतरच्या २०२३ च्या कायद्यात नियुक्तीची रचना बदलण्यात आली; या बदलासंबंधीची आव्हाने सर्वोच्च न्यायालयाच्या नोंदीतही नमूद आहेत.

**दिल्लीतील आंदोलनावरील कारवाईच्या निषेधार्थही निदर्शने**

दिल्ली पोलिसांकडून आंदोलनकर्त्यांवर करण्यात आलेल्या कारवाईचा निषेधही यावेळी करण्यात आला. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांना निवेदन पाठविण्यात आले.

या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, रामनाथ खोड, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), राजेंद्र आमटे (शेतकरी हक्क आंदोलक), हनुमान घोडके, बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी.जी.तांदळे (मार्गदर्शक महाराष्ट्र राज्य कृतीशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना बीड), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, प्रवीण आनेराव आदी सहभागी झाले होते.

---

# दुष्काळ जाहीर केला, पण हेक्टरी भाव सांगायला विसरले सरकार : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने अखेर राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर केला.२६ सप्टेंबर २०२६ रोजी मदत व पुनर्वसन विभागाने तसा शासन निर्णय ( ऋठ ) काढला मात्र जीआर मध्ये शेतकऱ्याच्या पदरात काहीच पडले नाही. हेक्टरी किती मदत मिळणार, याचा एक आकडा ही सरकारने सांगितलेला नाही. त्यामुळे दुष्काळ जाहीर झाला पण भाव जाहीर नाही, अशा विचित्र परिस्थितीत बळीराजा सापडला आहे.

सरकारने या जीआर मध्ये केवळ सवलतीची खिरापत वाटली आहे. जमीन महसूल माफ, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्ज वसुलीची स्थगिती, ७.५ क्ष्ञ पर्यंतच्या मोटारीचे विज



बिल माफ, विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ, अशा सवलती जाहीर केल्या आहेत. या सवलती कागदावर चांगल्या दिसतात, पण शेतकऱ्याच्या पोटाला याचा काय फायदा? शेतकऱ्याला आज पैशाची गरज आहे. बियाणे, खत, औषधासाठी घेतलेले कर्ज फेडायचे कसे ? पुढच्या हंगामाची तयारी कशी करायची? या प्रश्नाचे उत्तर सरकारकडे नाही. जीआर मध्ये एका ओळीत लिहून टाकले आहे. नुकसान भरपाई स्वतंत्र जीआर ने जाहीर होईल म्हणजे आज नाही, उद्या नाही, कधीतरी मिळेल !

बीड जिल्ह्यातील परिस्थिती तर अधिकच भयावह आहे. जिल्ह्यातील बहुतेक तालुके या यादीत आहेत. खरीप पिके पूर्णपणे जळून गेलेली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली. पण पावसाने दगा दिली. आता पंचनामे सुरू करा, जीपीएस फोटो काढा, अहवाल पाठवा. या प्रशासकीय सोपस्कारात आणखी दोन महिने जातील, तोपर्यंत शेतकऱ्याने जगायचे कसे ? सरकारने तात्काळ हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार शेख युनूस यांनी केली. पुढे ते म्हणाले, केवळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा करू नका. तर तात्काळ मदत खात्यात जमा करा, अशी संतप्त भावना त्यांनी व्यक्त केली.

---

## वीजग्राहकांनी २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल ऑनलाईन भरण्याचे महावितरणचे आवाहन

### बँक कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाचा परिणाम

**बीड । प्रतिनिधी**

बँक कर्मचाऱ्यांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर वीजग्राहकांनी २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल ऑनलाईन भरावे आणि गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत बँक कर्मचाऱ्यांनी संपाचा इशारा दिल्याने बँकिंग व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक वीज ग्राहक आपले वीजबिल धनादेशाद्वारे भरतात. त्यामुळे या कालावधीत वीजबिल भरणा व संकलन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो.

ज्या वीज ग्राहकांची प्रॉम्प्ट पेमेंट (तत्पर देयक भरणा) तसेच ड्यू डेट (अंतिम भरणा दिनांक) २८ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीमधील असेल अशा सर्व ग्राहकांनी गैरसोय टाळण्यासाठी शक्यतो ऑनलाइन पद्धतीने वीजबिल भरावे. महावितरणची अधिकृत वेबसाईट, मोबाईल प तसेच उपलब्ध डिजिटल पेमेंट सुविधांचा वापर करून घरबसल्या वीजबिलाचा भरणा २८ सप्टेंबरपूर्वी करावा. तसेच, प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंटचा लाभ घेण्यासाठी तसेच विलंब आकार टाळण्यासाठी ग्राहकांनी देय तारखेपूर्वी वीजबिल भरावे.

लातूर परिमंडलांतर्गत लातूर, धाराशिव व बीड मंडलातील बहुसंख्य ग्राहक प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंटचा लाभ घेत आहेत. त्यामुळे ग्राहकांनी ऑनलाइन पद्धतीने वेळेत वीजबिल भरून सवलतीचा लाभ घ्यावा आणि बँक कर्मचाऱ्यांच्या संपामुळे होणारी संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणने आहे.

---

# आयडेंटिटी कार्ड कागदावरच; पंचायत समितीत प्रत्यक्षात गायब!

**लेखी उत्तरात सर्वांच्या गळ्यात ओळखपत्र, पण कार्यालयात प्रत्यक्ष चित्र वेगळेच; नागरिकांचा संताप**

**आष्टी । प्रतिनिधी**

पंचायत समिती आष्टीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाजाच्या वेळी गळ्यात आयडेंटिटी कार्ड परिधान करावे, याबाबत मागणी करण्यात आली होती. त्यावर गटविकास अधिकारी प्रयाग धमाल यांनी लेखी उत्तर देत सर्व अधिकारी/कर्मचारी दैनंदिन ओळखपत्राचा वापर करीत आहेत, असे स्पष्ट केले आहे. मात्र प्रत्यक्ष कार्यालयात गेल्यानंतर अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गळ्यात आयडेंटिटी कार्ड दिसत नसल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे प्रशासनाचे लेखी उत्तर आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये तफावत असल्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**अधिकारी कोण, हे शोधण्यासाठी नागरिकांची धावपळ!**

शासकीय कामासाठी पंचायत समितीत येणाऱ्या नागरिकांना संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी कोण आहे, हे ओळखण्यासाठी वारंवार चौकशी करावी लागते. खुर्चीवर नेमका संबंधित अधिकारी बसला आहे की दुसरे कोणी, याचा ताळमेळ लागत नसल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. लेखी उत्तरात आयडेंटिटी कार्ड, मग प्रत्यक्षात गळ्यात कुठे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री उत्तर न देता प्रत्यक्ष कार्यालयीन पाहणी करून सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना ओळखपत्र वापरणे बंधनकारक आहे की नाही आणि त्याची अंमलबजावणी होते का, याबाबत स्पष्टता करावी, अशी मागणी होत आहे. कागदावर नियम आणि प्रत्यक्षात बेफिकिरी असेल, तर नागरिकांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

---

# चौसाळ्याच्या ग्रामविकास अधिकाऱ्याने माहिती अधिकाराचे केले उल्लंघन

## घनकचरा योजना, पाणंद रस्त्याच्या कामात केलेले आर्थिक घोटाळ्यासंदर्भात चौकशी समिती स्थापन करावी अशी गटविकास अधिकाऱ्याकडे केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री चव्हाण यांनी माहिती अधिकाराचे उल्लंघन केले असून मागितलेली माहिती देण्यास नकार दिला आहे. चौसाळा गावामध्ये घनकचरा योजना, पाणंद रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर अधिकाऱ्याची चौकशी समिती स्थापन करून झालेल्या कामाची चौकशी करावी अशी मागणी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्याकडे केली आहे.

सविस्तर माहिती अशी आहे की, चौसाळा ग्रामपंचायतीला गावाच्या विविध प्रकारच्या विकास करण्यासाठी शासनाकडून निधी मिळाला आहे. त्यामध्ये घनकचरा ही एक योजना आहे. गावांमध्ये सांडपाण्याचे खड्डे तयार करणे, ओला कचरा व सुका कचरा टाकण्यासाठी खड्डे खोदणे, सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे, गाव रोगराईमुक्त करणे या



आदी कामासाठी शासनाकडून सण सन २०२३-२०२४ मध्ये ५४ लाख रुपये मंजूर होऊन तो निधी ग्रामपंचायतला प्राप्त झाला. प्रत्यक्षात दोन वर्षात सदरील घनकचरा योजनेचे काम पूर्ण व्हायला पाहिजे होते ते काम गुत्तेदार, शाखा अभियंता व ग्रामविकास अधिकारी यांनी पूर्ण केले नाही. घनकचरा योजनेच्या कामाचे पैसे मात्र गुत्तेदारांनी उचललेले आहेत. तसेच चौसाळ्यातील तीन पानंद रस्त्यासाठी ग्रामपंचायतीला निधी मिळाला आहे व पाणंद रस्ते कुठे गेले आहेत? हे अर्धवट आहेत की पूर्ण झाले आहेत? हे जनतेला माहीत नाही. आपण घनकचरा योजना पानंद रस्ते योजनेचे कामे झाली आहेत काय? याच्यावर किती खर्च झाला आहे? कोण कोणत्या ठिकाणी कामे झाले आहेत? याची माहिती मी माहितीच्या अधिकारात मागितली होती परंतु, चौसाळ्याचे ग्रामविकास अधिकारी चव्हाण हे मला माहिती देण्यास टाळाटाळ करून माहिती दिली नाही.

घनकचरा योजना व पानंद रस्ता योजना या दोन्ही योजनेमध्ये अपहर, भ्रष्टाचार झालेला आहे. या कामाचे जिम्मेदार ग्रामविकास अधिकारी श्री चव्हाण व संबंधित गुत्तेदार व ग्राम रोजगार सेवक हे जिम्मेदार असून घनकचरा योजनेच्या कामाची व पानंद रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यासाठी गटविकास अधिकारी यांनी चौकशी समिती स्थापन करावी व दोशी असणारे ग्रामविकास अधिकारी व संबंधित गुत्तेदार व ग्रामरोजगार सेवक यांच्यावर कारवाई करावी नसता आपण लोकशाही मार्गाने जिल्हाधिकार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असे पत्रक असे सोनवणे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

---

# एन एस एल शुगर-युनिट ३पवारवाडी चे केमिकल मिश्रित दूषित पाणी व बेकायदेशीर बॉयलर बांधकाम बंद करा

**महाराष्ट्र पोलिस बॉईज असोसिएशनचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन; तातडीने कारवाईचे आश्वासन**

**माजलगाव । प्रतिनिधी**

एनएसएल शुगर-युनिट ३ कारखान्यातून केमिकल मिश्रित दूषित पाणी सोडले जात असल्याचा आरोप करत हे पाणी तात्काळ बंद करावे, तसेच बेकायदेशीरपणे करण्यात येत असलेले बॉयलरचे बांधकाम थांबवून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र पोलिस बॉईज असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्याकडे केली. महाराष्ट्र पोलिस बॉईज असोसिएशनचे धारूर तालुकाध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के व माजलगाव तालुकाध्यक्ष हारीष जाधव यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन याबाबत सविस्तर निवेदन दिले. यावेळी एन एस एल शुगर- युनिट ३



परिसरातील विविध समस्यांची माहिती त्यांना देण्यात आली.

केमिकल मिश्रित दूषित पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण होत असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला. परिसरातील नागरिकांच्या तक्रारी, दुर्गंधीची समस्या तसेच दूषित पाण्याचा प्रश्न याबाबत पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्र्यांना सविस्तर माहिती दिली. यासोबतच कारखाना परिसरात करण्यात येत असलेल्या बॉयलरच्या बांधकामाची कायदेशीरता तपासून, नियमबाह्य अथवा बेकायदेशीर बांधकाम असल्यास ते तातडीने बंद करावे, अशी मागणी करण्यात आली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीची चौकशी करण्यात यावी, अशीही मागणी पदाधिकाऱ्यांनी केली.

निवेदनाची दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याचे आदेश दिले असून, या प्रकरणात लवकरच कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती बाळासाहेब सोनटक्के व हारीष जाधव यांनी दिली. दरम्यान, दूषित पाणी, दुर्गंधी आणि बॉयलर बांधकामाबाबत प्रशासनाकडून प्रत्यक्ष चौकशी होऊन दोषींवर कारवाई होते का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या आरोग्य व पर्यावरणाशी संबंधित या प्रश्नावर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पोलिस बॉईज असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

---

### पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि मार्गदर्शनाची दखल

# मोहम्मद खमरुल इमान खान यांना 'राज्यस्तरीय उत्कृष्ट संपादक पुरस्कार २०२६'

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने योगदान देत समाजाला सकारात्मक दिशा देण्याचे कार्य करणारे मोहम्मद खमरुल इमान खान, संपादक दैनिक संघर्ष, बीड यांना ओरिजिनल कादरी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'राज्यस्तरीय उत्कृष्ट संपादक पुरस्कार-२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, सामाजिक समस्या, शैक्षणिक विषय तसेच समाजहिताचे विविध मुद्दे सातत्याने मांडत लेखणीच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम मोहम्मद खमरुल इमान खान यांनी केले आहे. पत्रकारिता ही केवळ बातमी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि सकारात्मक परिवर्तनाला चालना देण्याचे माध्यम आहे, या भूमिकेतून त्यांनी



पत्रकारितेचा प्रवास सुरू ठेवला. पत्रकारितेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग घेत विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचे, समाजहिताच्या उपक्रमांना पाठबळ देण्याचे आणि युवकांना सकारात्मक विचारांची दिशा देण्याचे कार्य केले. पत्रकारिता आणि सामाजिक कार्यासोबतच मार्गदर्शक म्हणून त्यांनी अनेकांना प्रोत्साहन देण्याचे काम केले, याचीही पुरस्काराच्या निमित्ताने दखल घेण्यात आली.

**मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव**

या पुरस्कार सोहळ्याला मराठवाड्याचे शिक्षणमहर्षी डॉ. गफार कादरी, बीडचे नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे प्रसिद्ध वकील ड. एस. एस. काजी, सेवानिवृत्त शिक्षक शेख फहीम सर, इरफान सिद्दिकी, नगरसेवक महेश धांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कादरी फाउंडेशनच्या वतीने देण्यात आलेल्या या पुरस्कारामध्ये पत्रकारिता, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय व अविरत योगदान, निर्भीड पत्रकारिता तसेच समाजाला सकारात्मक दिशा देणारे मार्गदर्शक कार्य यांचा गौरव करण्यात आला.

---

## मुस्लिम प्रभागातील अत्यावश्यक विकास कामे प्राधान्याने करा : माजी नगरसेवक अ‍ॅड. विकास जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**



२४ सप्टेंबर नगर परिषदेवर सत्ता कुणाचेही असो परंतु बीड शहरात बहुसंख्य मुस्लिम समाज बांधव वास्तव्यास असलेल्या अनेक मुस्लिम प्रभागात रस्ते नाल्यांचे कामे झाले नसल्याने त्या भागाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. पावसाळयात रस्त्यावर चिखलाचा खच साचत असून नाल्या नसल्यामुळे तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

एकंदरीत सत्ताधारी आणि विरोधकांना एक गट्टा मुस्लिमांची मते चालतात परंतु त्यांच्या भागातील समस्या सोडवण्यासाठी संकुचितपणे दुर्लक्ष केले जाते. ठराविक काही प्रभागात रस्ते नाल्या झाले असतील परंतु जिल्हा वार्षिक योजनेचा निधी असून देखील जाणीवपूर्वक बहुसंख्य प्रभागात नगर परिषदेने विकास कामे केले नाहीत ही मोठी शोकांतिका असून तेथील नागरिक मूलभूत सुविधा पासून वंचित रहात आहेत ही बाब मानवी मूलभूत तत्त्वांवर अन्यायकारक असल्याने जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ अंतर्गत महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेतुन प्रभाग क्र.२३ मोहम्मदिया कॉलनी येथील मोहम्मदिया मस्जिद पासून तें इंजि.मोमीन तारेक यांचे घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे, मोहम्मदिया कॉलनी येथील अब्दुल वहाब यांच्या घरापासून तें आर.एस. मोमीन यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे व इतर मुस्लिम प्रभागातील नागरिकांच्या मागणी वरून रस्ते, नाल्या व इतर अत्यावश्यक विकास कामे प्राधान्याने करण्याची मागणी जिल्हाधिकारी, बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक /अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अ‍ॅड. विकास जोगदंड यांनी केली आहे.

---

### मुंबई येथील देशभक्त पद्मश्री रत्नाप्पांण्णा जयंती उत्सव समितीचा उपक्रम

# आदर्श मुख्याध्यापिका दीप्ती औटी यांना लोकरत्न पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या आदर्श मुख्याध्यापिका यांना मुंबई येथील पद्मश्री डॉक्टर रत्नाप्पाण्णा जयंती उत्सव समितीतर्फे दिला जाणारा मानाचा लोकरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महात्मा गांधी जयंती दिनी २ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या दादर माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन दीप्ती औटी यांचा गौरव करण्यात येणार आहे. दीप्ती औटी या मागील २२ वर्षांपासून शहरातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत आहेत २००४ पासून २०१५ पर्यंत शिक्षिका म्हणून तर तेथून पुढे मुख्याध्यापिका म्हणून त्या यशस्वी सेवा देत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन शक्ती प्रतिष्ठान च्या वतीने त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन यापूर्वी गौरविण्यात आलेले आहे. चंपावती महोत्सव बीडचा आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार, त्यानंतर रोटरी क्लब च्या वतीने दिला जाणारा नेशन बिल्डर तसेच बीड



जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे.

थोर स्वातंत्र्य सेनानी देशभक्त पद्मश्री डॉक्टर रत्नाप्पाण्णा कुंभार जयंती उत्सव समितीतर्फे दरवर्षी राज्यातील समाज मान्य व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते यंदा या समितीचे जयंती उत्सव महोत्सवाचे ११७ वर्ष आहे. या जयंतीचे औचित्य साधून हा पुरस्कार वितरण सोहळा करण्यात येणार आहे. बीड शहरातील मुख्याध्यापिका दीप्ती औटी यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. आदर्श मुख्याध्यापिका दीप्ती औटी यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या समर्पित प्रयत्नांबद्दल हा पुरस्कार देण्यात येणार आहे. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत व संस्कारक्षम वातावरण निर्मिती दिलेल्या योगदानाबद्दल तसेच आपल्या कर्तव्याप्रती असलेली निष्ठ, शिस्त, नेतृत्वगुण आणि सेवाभावी वृत्तीबद्दल आदर्श मुख्याध्यापिका हा सन्मान पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे.

महात्मा गांधी जयंती दिनी २ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या दादर माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन आदर्श मुख्याध्यापिका दीप्ती देशमुख औटी यांचा गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती देशभक्त पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष महेश सायकर तसेच सचिव रमाकांत गोरे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. आदर्श मुख्याध्यापिका दीप्ती औटी यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय संस्थेचे अध्यक्ष, सचिव तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि शहरातील व जिल्ह्यातील अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com